स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Pench Tiger Reserve MAHARASHTRA

महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय

पहिला माळा, एफ.डी.सी.एम. भवन, ३५९/बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४० ०३६

दुरध्वनी क्र. ०७१२ - २८११९२१ Email ID :. dfowlpench@mahaforest.gov.in Website:- www.mahapenchtiger.com

# पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये कृषी - वन पर्यटनाबाबत पर्यटकांसाठी सर्वसाधरण मार्गदर्शक सुचना, अटी व शर्ती

पेंच व्याघ्र प्रकल्प (PTR), महाराष्ट्राच्या मध्यातुन वाहणाऱ्या पेंच नदीच्या पश्चिमेकडील पश्चिम पेंच, घाटपेंढरी वनपरिक्षेत्रांतर्गत कोलितमारा हे गाव येते. हे पेंच व्याघ्र प्रकल्पातील सात निसर्ग पर्यटक प्रवेशद्वारापैकी एक आहे आणि पेंच व्याघ्र प्रकल्पातील सर्वात जुन्या वन विश्रामगृहापैकी एक विश्रामगृह कोलितमारा येथे आहे. नागपूरपासून अंदाजे ७० किमी अंतरावरील हा परिसर निसर्गप्रेमी आणि पक्षी निरीक्षकांसाठी नंदनवन आहे. हे गाव आदिवासीबहुल असल्याने आदिवासींच्या जीवनाचे अनोखे दर्शन घडते.

पेंच व्याघ्र प्रकल्प व्यवस्थापन व्याघ्र प्रकल्पाच्या पश्चिम भागात निसर्ग पर्यटनासंबंधीत उपक्रमांना चालना देत आहे, ज्याचा उद्देश व्याघ्र प्रकल्पालगतच्या गावात वर्षभर उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देणे, हा आहे. सदर क्षेत्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारसाचे आणि जैवविविधतेचे दर्शन पर्यटकांना करुन देणे. या उद्देशाने पेंच व्याघ्र प्रकल्प विभाग पश्चिम पेंच, घाटपेंढरी वनपरिक्षेत्रातील कोलितमारामध्ये **कृषी - वन पर्यटन** या नाविण्यपुर्ण उपक्रमाची सुरूवात करत असुन या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना पुढील प्रमाणे सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

- **कृषी - वन पर्यटन** या नाविण्यपुर्ण प्रकल्पामध्ये गावामधुन बैलगाडीमध्ये सफर करणे, म्हैस चालवणे आणि शेतीच्या कामात सहभाग समाविष्ट आहे.
- पर्यटकांना समृद्ध आदिवासी संस्कृती, त्यांचे दैनंदिन जीवन, सण-उत्सव इत्यादींची ओळख करून दिली जाईल.
- पर्यटकांना गावात पिकवल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या पिकांच्या शेतीचे तंत्र सांगितले जाईल.
- निसर्गरम्य शांत जंगलाच्या पार्श्वभूमीवर ते पेंच नदी मध्ये बोटिंगचा आनंद घेऊ शकतात. समृद्ध पक्षी विविधतेमुळे, पर्यटकांना या भागातील समृद्ध जैवविविधतेचा वारसा आवडेल.
- गावातील शेतात उभारलेल्या मचानमध्ये रात्रीचा मुक्काम केल्याने स्वच्छ आकाशात तारे पाहण्याचा आनंद संस्मरणीय होईल.
- इतर वैशिष्ट्यांमध्ये आदिवासी समुदायाशी संवाद, ग्रामीण खेळ, सूर्यास्त आणि सूर्योदयाचे दृश्य इत्यादींचा समावेश आहे.
- स्थानिक पद्धतीने शेतजमिनीत पिकवलेले भाज्या व फळे वापरून स्थानिक पध्दतीने खाद्यपदार्थ शिजवले व सर्व्ह केले जातील. या संपूर्ण काळात पर्यटकांना स्थानिक गाईडची साथ असेल.

- पेंच व्याघ्र प्रकल्पाचा हा उपक्रम ग्राम परिस्थितीकीय विकास समिती, कोलितमारा आणि आनंदीबाई बचतगटाच्या माध्यमातून संयुक्तपणे राबविण्यात येत आहे.
- पर्यटकांना कोलितमाराच्या पर्यटन संकुलातही राहण्याची सोय उपलब्ध आहे आणि पर्यटक सफारीही बुक करू शकतात.
- समुहाने सफारी करण्यास ईच्छुक असलेल्या पर्यटकांनाकरिता कँटर सुध्दा उपलब्ध आहे.
- छायाचित्र ओळखपत्र अनिवार्य आहे.
- पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या कृषी - वन पर्यटनाकरिता http://mahaecotourism.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन आरक्षणाची सुविधा पर्यटकांकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
- कृषी - वन पर्यटनाकरिता पर्यटन शुल्क रु. २,०००/- आकारण्यात येईल.
- मचानावरील मुक्काम आणि भोजनाचे शुक्ल पर्यटकांना वेगळयाने भरणा करावे लागेल.
- कृषी - वन पर्यटन केंद्रावरील आपला अनुभव व प्रतिक्रिया, तेथे उपलब्ध प्रतिक्रिया नोंदवहीत अवश्य नोंदविण्यात यावी.

*********